**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार**
**ता.वसई, जि. पालघर**

जा.क्र. वविशम/भांडार/६६५/२०२४
दिनांक :- २८/०८/२०२४

**इसारा रक्कम रु. १०,०००/-**

## जाहिर दरपत्रक

याद्वारे सर्व पुरवठादार, संस्था व व्यक्ती यांचे माहितीसाठी कळविण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेस खालील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे निर्माल्य कलश पुरवठादार व संस्था यांचेकडून दि.०४/०९/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता बंद पाकिटातून दरपत्रके (कोटेशन) मागविण्यांत येत आहेत. सदरची दरपत्रके भांडार विभाग, मुख्यालय येथे सादर करण्यात यावी.

| अ.क्र | तपशिल | परिमाण |
|---|---|---|
| १. | **निर्माल्य कलश पुरविणे.**<br>मटेरियल – एफ.आर.पी.<br>साईज – Diameter ४' X Height 4.5'<br>वजन – ४० Kg क्षमतेचे<br>रंग – ब्राऊन अथवा गोल्डन स्टॅन्ड सहित | प्रति नगाचा दर |

**अटी - शर्ती**

१) पुरवठादाराने स्वत:चे लेटरपॅडवर दरपत्रक सादर करावे. दर पत्रकावर वस्तू व सेवाकर नोंदणी क्रमांक (GST) असणे बंधनकारक राहील.
२) मालकाचे / संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यात यावे.
३) दरपत्रकदारांनी जाहिर निविदा सुचनामध्ये नमुद केलेली इसारा अनामत रक्कम डिमांड ड्राप्ट स्वरुपात दरपत्रक सादर करतेवेळी जमा करावयाचा आहे (दरपत्रकातील लिफाफ्या मध्ये डीमांड ड्राप्ट टाकू नये) अन्यथा आपले दरपत्रक स्विकारले जाणार नाही.
४) दरपत्रक मुदतीत व वेळेमध्ये भांडार विभाग, मुख्यालयामध्ये आवक करणे बंधनकारक राहील.
५) दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहून अंदाजित खर्चाच्या २% सुरक्षा अनामत रक्कम डिमांड ड्राप्ट अथवा रोख रक्कम मार्फत भरणा करुन ३ दिवसांत करारनामा करावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.
६) दरपत्रकात नमुद साहित्यांचे दर हे सादर करताना मुळ किंमत, वस्तू व सेवाकर (GST), वाहतूक खर्च वेगवेगळे दर्शविण्यात यावेत.
७) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा. उप आयुक्त (भांडार) यानां राहील.
८) वरील अटीचे पालन जे पुरवठादार करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यात येईल.
९) यासंबधींची दरपत्रके स्वत:चे लेटरपॅडवर बंद पाकिटातून दि.०४ /०९/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत भांडार विभाग, मुख्य कार्यालय, विरार (पूर्व) येथे सादर करावीत.

मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि.०४/०९/२०२४ रोजी सायं. ४.०० वाजता मा. उप आयुक्त यांचे दालनात उपस्थित दरपत्रकदार अथवा त्यांचे प्रतिनिधी ह्याचे समक्ष उघडण्यात येतील.

**(मा. श्री. आयुक्त साहेब यांच्या मंजुरीने)**

स्थळ :- मुख्य कार्यालय, विरार
दिनांक :-२८/०८/२०२४

(अर्चना दिवे)
उप आयुक्त (भांडार)
वसई विरार शहर महानगरपालिका